सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४७ | मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



सौ. ज्योती महाजन
माजी नगरसेविका



श्री. पांडुरंग पाटील
ज्येष्ठ पत्रकार



सौ. कोमल वर्मा
अमळनेर



श्री. संजीव खोंडे
अमळनेर

**समाजकंटकांमुळे अंबर्षी टेकडीवर आगीचे सत्र सुरूच**

पान २ वर...

'माझा संकल्प- भूमी सुपोषण' चळवळीसाठी

# अमळनेरला बुधवारी भव्य महाशोभायात्रा

## अक्षय कृषी परिवार, मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे उपस्थितीचे आवाहन

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपो¬ण एव सरक्षण अभियान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कृषी क्षेत्रातील अग्रगण्य सेवाभावी संस्था अक्षय कृषी परिवार व येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे माझा संकल्प- भूमी सुपोषण चळवळीसाठी जनजागर व्हावा, यासाठी बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी भव्य महाशोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ऐतिहासिक व अभूतपूर्व होणाऱ्या या महाशोभायात्रेचे अमळनेरकरांनी साक्षीदार व्हावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व श्री मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

महाशोभायात्रा सुरू होण्यापूर्वी सर्वांना पोटभर नाश्ता दिला जाणार आहे. महाशोभायात्रा मार्गावरही ठिकठिकाणी गोळ्या- बिस्किटे, हलका- फुलका नाश्ता व जलपानाची व्यवस्था केली जाणार आहे. सर्व शाळा- महाविद्यालये, विद्यार्थी- विद्यार्थिनी, विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व महिला संघटनांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व श्री मंगळग्रह सेवा संस्थेने केले आहे.

### महाशोभायात्रा प्रारंभ, स्थळ व मार्ग

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थान येथून महाशोभायात्रेस प्रारंभ होईल. संतश्री सखाराम महाराजांची वाडी- सराफ बाजार- कोंबडी बाजार- हॉटेल पायल- राणी लक्ष्मीबाई चौक- मोठा बाजार- दगडी दरवाजा- फरशी रोडमार्गे श्री मंगळग्रह मंदिरात महाशोभायात्रेची सांगता होईल. (मंदिरात महाशोभायात्रेतील सहभागींसाठी भोजन व्यवस्था आहे.)

# शिवकालीन शौर्याच्या प्रतिमांनी वेधले लक्ष..!

## शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर अमळनेर झाले भगवेमय...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील :**

अमळनेर : हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहर भगवेमय झाले आहे. बोरी पुलावर ऐतिहासिक फलक लावण्यात आले आहे. मावळ्यांच्या शौर्याच्या प्रतिमा आणि दिमाखदार ध्वजांनी स्वराज्याची अनुभूती येत आहे. सर्वत्र उत्साह, अभिमान आणि शिवमय वातावरण अनुभवायला मिळत आहे.

प्रमुख रस्ते, चौक, शासकीय इमारती तसेच बाजारपेठा भगव्या ध्वजांनी सजल्या आहेत. सर्वत्र शिवभक्तीचा जागर घुमताना दिसूनयेत आहे. बोरी पुलावर करण्यात आलेली आकर्षक व दिमाखदार सजावट नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. बोरी पुलावरील पथदिव्यांच्या प्रत्येक खांबावर भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूंनी सलग रांगेत उभारलेले ध्वज तसेच ऐतिहासिक घटनांच्या लावलेल्या फलकांनी स्वराज्याच्या गड-किल्ल्यांची आठवण ताजी होत आहे. यासोबतच मावळ्यांच्या शौर्य, पराक्रम आणि निष्ठेची साक्ष देणाऱ्या देखण्या प्रतिमा खांबांवर लावण्यात आल्या आहेत. शिवकालीन इतिहास जिवंत असल्याचा भास निर्माण होत आहे. यातून तरुण पिढीला प्रेरणा देणारा संदेश दिला जात आहे. सायंकाळी पथदिव्यांच्या प्रकाशात फडकणारे भगवे ध्वज आणि ऐतिहासिक प्रतिमा यामुळे संपूर्ण पुलावर वेगळेच तेज प्राप्त होत आहे. पुलावरून ये-जा करणारे वाहनचालक, पादचारी व नागरिक काही क्षण थांबून ही सजावट पाहत आहेत. अनेक शिवप्रेमी येथे छायाचित्रे व सेल्फी घेत उत्सवाच्या आठवणी जतन करताना दिसत आहेत. ही सजावट स्थानिक शिवप्रेमी, युवक मंडळे व नागरिकांच्या स्वयंप्रेरणेने आणि सहकार्याने उभारण्यात आली आहे. शिवजयंती उत्सव भव्य स्वरूपात साजरा व्हावा, तसेच शहरात इतिहासाबद्दल अभिमानाची भावना दृढ होत आहे.



*अमळनेर : खांबा- खाबांवर झळकतोय शिवरायांच्या शूर सरदारांचा मर्दानी इतिहास.*



### बाजारपेठ, रस्त्यांवर सजली दुकाने

बाजारपेठेत, रस्त्याच्या कडेला दुकाने थाटण्यात आली आहेत. ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध रंगाच्या आकर्षक अशा मूर्ती, प्रतिमा, मावळ्यांच्या मूर्ती, भगवे ध्वज, फेटे, स्टिकर, दुपट्टे व विविध धार्मिक साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. नागरिकांची खरेदीसाठी झुंबड उडत आहे.

## मानाचा शिवजन्मोत्सव होणार जल्लोषात

### जय्यत तयारी; शिवप्रेमींचा उत्साह शिगेला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दरवर्षीप्रमाणे यंदाही सार्वजनिक शिवजयंती समितीतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचा मानाचा शिवजन्मोत्सव मोठ्या थाटामाटात, जल्लोषात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा होणार आहे. सर्वत्र शिवप्रेमींचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु आहे.

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह परिसराची स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात आले आहे. आकर्षक विद्युत रोषणाईची विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पॉलिश करून परिसर अधिक देखणा करण्यात येत आहे.

मिरवणुकीच्या प्रारंभी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते पूजन होणार आहे. प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, मुख्याधिकारी गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या भव्य सोहळ्यात दरवर्षी फक्त धार्मिक गाणे वाजवण्यात येतात. विविध शाळा व संस्थांच्या विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. सायरादेवी बोहरा इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांचे पथनाट्य, न्यू व्हिजन स्कूलच्या लहान मुलांचे कर्तृत्वपूर्ण सादरीकरण, वृक्षवल्ली महिला लेझीम पथकाचे सादरीकरण, रमाई लेझीम पथक, जीत स्टुडिओ ग्रुप यांचे छत्रपती शिवाजी महाराजांवरील नृत्याविष्कार, कन्हैया



ग्रुप व रुबजी नगर ग्रुप यांच्या वतीने लाठी-काठी व तलवारबाजीचे प्रात्यक्षिक तसेच आदिवासी बांधवांचे ढोल पथक विशेष आकर्षण ठरणार आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी समितीच्या वतीने विशेष दक्षता घेतली जाते. पालिकेतर्फे मोलाचे सहकार्य लाभत आहे. मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सर्व सहभागी कलावंतांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात येणार आहे. मिरवणुकीदरम्यान विविध ठिकाणी अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पालिका हायस्कूल येथे खान्देश रक्षक फाउंडेशन ग्रुप व आजी- माजी सैनिक फाउंडेशनतर्फे यांच्या वतीने अल्पोपहार देण्यात येणार आहे. पालिका शाळा ते नाट्यगृह मार्गावर भूषण चौधरी यांच्या वतीने

पान २ वर

भव्य महाशोभायात्रा

श्री मंगळग्रह मंदिर अमळनेर | भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान | मंगळ ग्रह सेवा संस्था, अमळनेर

जहाल विषारी रासायनिक खते व कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे आपल्या परम पवित्र भारतमातेची शेती व माती विषारी व निकस झाली आहे...!

मेरा संकल्प - भूमी सुपोषण चळवळ

देशभर प्रभावीरित्या राबवूया...!!! त्यासाठीच्या

जनजागर महाशोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊया...!!!!

चला आपली भूमी, शेती व माती सकस, विषमुक्त व उपजावू करूया...!



महाशोभायात्रेची तारीख व वेळ
बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६
वेळ : सकाळी ८ वाजता.
महाशोभायात्रा प्रारंभ स्थळ
संतश्री सखाराम महाराजांची वाडी

आपले स्वागताभिलाषी,
अक्षय कृषी परिवार व
मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर

## संपादकीय

### मोबाईलच्या अतिरेकी वापराने जीवन उध्वस्त होण्याचा धोका

रात्रीचे अडीच वाजलेले. उंच इमारतीचा नववा मजला. आणि काही क्षणांत तीन कोवळे जीव खाली कोसळतात. उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे घडलेली ही घटना केवळ एक कौटुंबिक शोकांतिका नाही; ती आधुनिक समाजाच्या डिजिटल व्यसनाधीनतेचा धोकादायक चेहरा उघड करणारी आहे. १६, १४ आणि १२ वर्षांच्या मुलींचा मृत्यू हा केवळ एका कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या जागृतीचा प्रश्न आहे. प्राथमिक माहितीनुसार त्या 'व्हर्च्युअल गेम'च्या प्रभावाखाली इतक्या अडकल्या होत्या की वास्तवाशी त्यांचा संपर्क तुटत चालला होता. प्रश्न असा आहे, की या घटनेला केवळ 'गेमचा परिणाम' म्हणून पाहणे पुरेसे आहे का? मोबाईल फोन, इंटरनेट, सोशल मीडिया किंवा ऑनलाईन गेम ही सर्व साधने स्वतःमध्ये निरुपद्रवी आहेत. परंतु नियंत्रण, मार्गदर्शन आणि संवादाचा अभाव असेल, तर ती साधने विनाशाचे कारण ठरू शकतात.

आज अनेक घरांमध्ये एकच चित्र दिसते, की जेवणाच्या टेबलावर शांतता, प्रत्येकाच्या हातात स्क्रीन आणि संवाद शून्य. पालक व्यस्त, मुले गुंतलेली. घरात वाय–फाय 'फुल सिग्नल'मध्ये, पण नातेसंबंध 'नो नेटवर्क'मध्ये. डिजिटल व्यसनाची काही लक्षणे स्पष्ट दिसू लागली आहेत. त्यामध्ये पालकांशी उग्रपणे बोलणे किंवा संवाद टाळणे, स्क्रीनपासून दूर झाल्यावर चिडचिड, वास्तविक मित्रांपेक्षा आभासी जगात जास्त रमणे, कुटुंबीय उपक्रमांमध्ये अनुत्साह. ही केवळ 'वयाची लक्षणे' नाहीत; ती भावनिक दुराव्याची चिन्हे आहेत. या घटनेत दोष त्या निष्पाप मुलींचा नाही. प्रश्न पालकत्वाच्या बदलत्या स्वरूपाचा आहे. आपण मुलांना अत्याधुनिक स्मार्टफोन देतो, पण त्यांना भावनिक आधार देण्यासाठी वेळ देतो का? आपण 'अनलिमिटेड डेटा' देतो, पण मर्यादित संवाद ठेवतो. तंत्रज्ञानावर पूर्ण बंदी हा उपाय नाही. परंतु तंत्रज्ञानासोबत मूल्यांचे, संस्कारांचे आणि खुल्या संवादाचे संगोपन आवश्यक आहे.

यावर उपाय म्हटल्यास स्क्रीन–फ्री वेळ अनिवार्य करा. विशेषतः जेवताना मुलांशी संवाद वाढवा, त्यांना काय आवडते, काय पाहतात, कोणाशी बोलतात हे जाणून घ्या. मैदानी खेळ आणि कौटुंबिक उपक्रम वाढवा. प्रत्यक्ष अनुभवांची जागा कोणतेही ॲप घेऊ शकत नाही. डिजिटल साक्षरता द्या. धोके, फसवणूक, मानसिक परिणाम याबद्दल खुलेपणाने चर्चा करा. आज प्रत्येक पालकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. आपली मुले आपल्यासोबत राहतात की फक्त आपल्या घरात राहतात? त्यांच्या डोळ्यांत जीवंतपणा आहे की केवळ स्क्रीनचा परावर्तित प्रकाश? गाझियाबादमधील ही घटना केवळ एक बातमी म्हणून विसरण्यासाठी नाही, तर ती इशारा आहे. डिजिटल साधनांचा वापर विवेकाने न केल्यास त्याची किंमत अपरिमित असू शकते. तंत्रज्ञानाला दोष देण्यापेक्षा त्यावर नियंत्रण ठेवणारे आपणच आहोत, हे लक्षात ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण शेवटी मुलांना मोबाईलची नाही, तर माणसांची गरज असते.

# समाजकंटकांमुळे अंबर्षी टेकडीवर आगीचे सत्र सुरूच

## अग्निशमन दल, टेकडी प्रेमींच्या प्रयत्नांनी आग आटोक्यात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील चोपडा रस्त्यावरील अंबर्षी टेकडीवर पुन्हा आग लागली आहे. रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी लागलेल्या आगती सुमारे ६० वृक्ष जळून खाक झाली आहेत. पालिकेचे अग्निशमन दल व टेकडी प्रेमींच्या अथक प्रयत्नांनी आग आटोक्यात आली आहे. अंबर्षी टेकडीवर आगीचे सत्र सुरूच असून, समाजकंटकांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.



सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास टेकडीच्या खालच्या बाजूला आग लागली. रमेश कंजर, नरेश कांबळे, सुरेश भावसार यांनी सुरुवातीला आग विझवण्याचे प्रयत्न केले. त्यांनंतर मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना कळविण्यात आले. त्यांनी अग्निशमन दलास माहिती दिली. दलप्रमुख गणेश गोसावी, दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, जफर पठाण, भिका संदानशिव, आकाश संदानशिव यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.

अंबर्षी टेकडी हे निसर्गरम्य स्थळ असून, तेथे पालिकेचे जल शुद्धीकरण केंद्र देखील आहे. दरवर्षी याठिकाणी झाडे लावली जातात. मात्र, बिडी, सिगारेट आणि गांजा पिणारे याठिकाणी पेटती काडी टाकून निघून जातात. त्यामुळे नेहमी आग लागून झाडे जळतात. पालिका आणि पोलीस प्रशासनने उपाययोजना राबवून अशा समाजकंटकाना आळा घालावा आणि पर्यावरणाचे रक्षण करावे, अशी मागणी होत आहे. नरेश कांबळे याठिकाणी नेहमी लक्ष ठेवून असतात. मात्र, या टेकडीकडे पालिकेचे दुर्लक्ष होत आहे. हजारो झाडे याठिकाणी असल्याने एकप्रकारे हा ऑक्सिजन पार्क आहे. ज्याप्रमाणे शिवाजी बगीचा व इतर ठिकाणी वॉच मन ठेवण्यात आले आहे. त्याप्रमाणे टेकडीवर देखील वॉचमन ठेवल्यास पाणीपुरवठा यंत्रणा आणि टेकडीचे संरक्षण केले जाईल असे पर्यावरणप्रेमींनी सांगितले.



अमळनेर : अन्न महोत्सव स्पर्धेचे परीक्षण करताना प्रा. डॉ. नलिनी पाटील.

# प्रताप महाविद्यालयात अन्न महोत्सव स्पर्धा

### सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचा उपक्रम; ३५ विद्यार्थ्यांचा सहभाग

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व मायक्रोबायोलॉजिस्ट असोसिएशनतर्फे (इंडिया) एम. एस्सीच्या विद्यार्थ्यांसाठी अंबवलेले अन्न महोत्सव उत्साहात झाला. यात ३५ विद्यार्थ्यांनपी सहभाग घेतला. जिवाणू तसेच यीस्ट यांच्या सहाय्याने फरमेंट केलेले विविध प्रकारचे पोषक पदार्थांचे सादरीकरण केले.

गणित विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. नलिनी पाटील यांनी परीक्षण करून विविध पौष्टिक पाककृतीं बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस. ए. जोशी यांनी सांगितले, की अभ्यासक्रमातील विषयाला आपण उपयोजित पद्धतीने कृतीद्वारे कसे सादर करू शकतो हे अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शिकायला मिळते. प्रा. हेमलता सूर्यवंशी–भोसले यांनी आभार मानले. प्रा. वैशाली महाजन, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### पं. दीनदयाल उपाध्याय पुण्यतिथी

# द्रौ. रा. कन्या शाळेत चित्रकला, निबंध स्पर्धा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिक्षण विभागाच्या आदेशानुसार येथील द्रौ. रा. कन्या शाळेत चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. चित्रकला स्पर्धेचा विषय पं. दीनदयाल उपाध्याय यांचे व्यक्तिचित्रण तसेच त्यांचा 'एकात्म मानव सिद्धांत' व ग्रामीण विकास हा होता. या स्पर्धेत एकूण ४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. त्यापैकी उत्कृष्ट ठरलेल्या तीन विद्यार्थिनींची चित्रे जिल्हास्तरावर पाठविण्यात आली आहेत. निबंध स्पर्धेत २१ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनकार्य व विचारांवर आधारित लेखनातून विद्यार्थिनींनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. यातील तीन निबंध जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवडण्यात आले. उच्च प्राथमिक गटातील चित्रकला स्पर्धा प्रमुख डी. एन. पालवे यांनी घेतली, तर निबंध स्पर्धेचे नियोजन व मार्गदर्शन सौ. पी. एस. सराफ यांनी केले. उपमुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बाविस्कर यांनी स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या



अमळनेर : द्रो. रा. कन्या शाळेत झालेल्या चित्रकला, निबंध स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी.

सहभागातून पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांचा परिचय घडवून देण्याचा उपक्रम यशस्वी ठरला. मुख्याध्यापिका एस. एस. सूर्यवंशी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वितेसाठी सहकार्य केले.

# मानाचा शिवजन्मोत्सव होणार जल्लोषात

पान १ वरून

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.पाचपांवली देवी मंदिर चौक येथे विजय पाटील (पाटील बिल्डर्स) यांचा कडून लस्सी वाटप, बसस्थानक येथे निलेश फार्मा यांच्या वतीने लस्सी वाटप, विजय मारोती मंदिर येथे हनुमान चालीसा पठणावेळी 'किंग्स ऑफ किंग्स' ग्रुपच्या वतीने (लाडू) प्रसाद वितरण, महाराणा प्रताप चौक येथे योगेंद्र बाविस्कर व तुषार बाविस्कर यांच्या वतीने थंड पेय वाटप, निखिल चव्हाण आणि करण नेरकर कडून कोर्टाच्या परिसरात शरबत वाटप, राज लाड यांच्या वतीने ताक वाटप, तर नाट्यमंदिर येथे आकाश परदेशी यांच्या वतीने थंड पेय वितरण करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही रणजित शिंदे यांच्या वतीने त्यांच्या चिरंजीव शिवतेज यांच्या वाढदिवसानिमित्त नाट्यमंदिर येथे शिवभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रक्तदात्यांचा सन्मान स्कूल बॅग भेट देऊन मा. डी.वाय.एस.पी. विनायक कोते व पी.आय. दत्तात्रय निकम यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. युवा मित्र परिवार नेहमीप्रमाणे समाजकार्यात अग्रेसर असून आदर्श शिवजयंती साजरी करणे हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे समितीने सांगितले.

# डॉ. आर. सी. सरवदे राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. सी.सरवदे यांना धुळे येथील श्रीराम फाउंडेशनतर्फे स्वामी विवेकानंद राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी नवलनगर येथे झालेल्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्काराबद्दल प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, डॉ. विजय तुंटे, डॉ. धनंजय चौधरी, डॉ. धिरज वैष्णव, डॉ. संदीप नेरकर, डॉ. शशिकांत सोनवणे, डॉ. अशोक



पाटील, डॉ. अमित पाटील, डॉ. कैलास निळे, डॉ. तुषार रजाळे, डॉ. माधव भुसनर, प्रा. संतोष दिपके, डॉ. रवी बाळसकर, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. मुकेश भोळे, डॉ. नीलेश चित्ते, प्रा. शशिकांत जोशी, प्रा. विजय साळुंखे, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. ज्ञानेश्वर मराठे, डॉ. विलास गावित, डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. महेंद्र महाजन, डॉ. विवेक बडगुजर, प्रा. रामदास सुरळकर, डॉ. किरण गावित, डॉ. बालाजी कांबळे, डॉ. अनिल झळके, प्रा. नितेश कोचे, डॉ. सुनील राजपूत, डॉ. हेमंत पवार, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. योगेश पाटील, डॉ. रमेश माने, प्रा. रोहन गायकवाड, प्रा. अवित पाटील, कुलसचिव राकेश निळे, कार्यालयीन अधिक्षक देवेंद्र कांबळे, भटू चौधरी, विजय ठाकरे, योगेश बोरसे, संदेश शर्मा, संदीप सोनवणे, कमलाकर पाटील,धनराज मोरे, दुर्योधन नेरकर, नितीन राजपूत, रोहित ठाकूर, पराग पाटील आदींनी अभिनंदन केले आहे.

### टाकरखेडा येथे बुधवारी भास्कर पेरे– पाटलांचे व्याख्यान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील टाकरखेडा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती व श्री शनी महाराज मंदिराच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जि. प. प्राथमिक शाळेत प्रख्यात वक्ते भास्कर पेरे–पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर अध्यस्थानी असतील. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुरेखाताई पवार, धुळे येथील सहायक पोलीस निरीक्षक सौ. वर्षाताई पाटील प्रमुख अतिथी असतील. ग्रामस्थांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शनि महाराज सेवा समिती व सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे.



जळगाव : पत्रकार ईश्वर महाजन यांना गुणवंत पत्रकार पुरस्कार प्रदान करताना महापौर दीपमाला काळे.

# पत्रकार ईश्वर महाजन यांना गुणवंत पत्रकार पुरस्कार प्रदान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील देवगाव– देवळी येथील माध्यमिक शिक्षक तथा पत्रकार ईश्वर रामदास महाजन यांना "गुणवंत पत्रकार पुरस्कार २०२६" प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे. जळगाव येथील अल्पबचत भवनात रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मुक्ताई महिला बहुउद्देशीय संस्था व जन्म प्रतिष्ठानचे पंकजभाऊ नाले व विश्वस्त मंडळाने त्यांना हा सन्मान बहाल केला. जळगावच्या नवनिर्वाचित महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते ईश्वर महाजन यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि मानाचा फेटा बांधून गौरविण्यात आले. जी.एच. रायसोनी महाविद्यालयातील डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशनचे विभागप्रमुख रफिक शेख अध्यक्षस्थानी होते. डायट प्राचार्य निळकंठ गायकवाड, आमदार राजूमामा भोळे, माजी महापौर जयश्रीताई महाजन, भुसावळच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा गायत्रीताई भंगाळे, गटशिक्षणाधिकारी तथा गट संचालक विजय पवार, सुनील पाटील (शिरपूर), विधीतज्ञ ॲड. निखिल पाटील, मराठी सिनेगायक संघपाल तायडे, अर्चना माळी, भारतीताई काळे, नीताताई सोनवणे, सुनील पाटील, मुकुंद रोटे आदी उपस्थित होते. किशोर पाटील यांनी प्रस्ताविक केले. ज्योतीताई राणे यांनी सूत्रसंचालन केले. हायस्कूलचे अध्यक्ष विलासराव पाटील, मुख्याध्यापक अनिल महाजन, पत्रकार संदीप पाटील, शैलेंद्र ठाकूर, देवेंद्र पाटील, राजा माने, व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले आदींनी ईश्वर महाजन यांचे अभिनंदन केले आहे.

# शिवसेनेतर्फे संत श्री सेवालाल महाराज जयंती उत्साहात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेरः येथील शिवसेना कार्यालयात संत श्री सेवालाल महाराज जयंती उत्साहात झाली. यावेळी ग्रामीण व शहरी विभागातील बंजारा समाजातील लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश अर्जुन पाटील यांनी समाज बांधवांना मार्गदर्शन केले. संत श्री सेवालाल महाराज यांच्या कार्याचा व विचारांचा जागर केला. समाजाने एकत्रित राहून शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रगती साधावी, असे आवाहन केले. यावेळी विधानसभा क्षेत्रप्रमुख रवींद्र पाटील, उपतालुकाप्रमुख




अमळनेर : संत श्री सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करताना शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील. शेजारी उपस्थित मान्यवर.

भूषण कोळी, तालुका संघटक तथा रामेश्वर खुर्दचे सरपंच गजेंद्र जाधव, संत श्री सेवालाल महाराज जयंती समितीचे अध्यक्ष किरण जाधव, प्रसिद्धी प्रमुख अनिल पवार, संजय राठोड, विजय राठोड, अर्जुन राठोड, किशोर पवार, रणजीत राठोड, पांडुरंग जाधव, दीपक सैंदाणे, संदीप पवार, रितेश बोरसे, उमाकांत चव्हाण, मल्हारी पाटील आदी उपस्थित होते. सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जयंती समितीचे अध्यक्ष किरण जाधव यांनी आभार मानले.

# ओम गुरुदेव नमः महिला पतंजली योग समितीतर्फे समिती गठीत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : ओम गुरुदेव नमः महिला पतंजली योग समितीतर्फे महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी अमळनेर तहसीलसाठी समीती गठीत करण्यात आली. जिल्हा महामंत्री ज्योती पाटील यांच्या उपस्थितीत पदग्रहण सोहळा पार पडला. अमळनेर तहसील प्रभारी कामिनी पवार, कोषाध्यक्ष रत्ना भदाणे आणि प्रा. उषा पवार, संघटन मंत्री निवेदिता कापडणे, महामंत्री ज्योती पाटील, वैशाली भामरे, मिडीया प्रभारी माधुरी पाटील आणि रेखा भागवत, संवाद प्रभारी रुपाली पाटील आणि रूपाली बोरसे अशी पदे वितरीत करण्यात आली. तसेच महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला



अमळनेर : ओम गुरुदेव नमः महिला पतंजली योग समितीच्या पदाधिकारी व सदस्या.

होम हवन सोहळा पार पडला. रेऊनगर येथील विश्वकर्मा मंदिर ढेकूरोड महादेवाची आराधना करून सोहळा पार पडला. प्रत्येक योग वर्गातील योग साधकाने आपल्याला योगाचे फायदे व सकारात्मक अनुभव सांगितले. या कार्यक्रमात तांबेपुरा, शिवाजी नगर, रामवाडी, पटवारी कॉलनी, ढेकू रोड, पिंपळे रोड, दाजीबा नगर असे सर्व १० योग वर्गाचे योग शिक्षक व योग साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समिती गठीत करण्यासाठी जिल्हा प्रभारी जयश्री पाटील व राज्य कार्य कारणी महानंदा पाटील यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. कामिनी पवार आणि सर्व योग शिक्षक यांनी सहकार्य केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com




# स्वातंत्र्यलढ्याचे आद्य क्रांतिकारक : वासुदेव बळवंत फडके

**पुण्यतिथी विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे आद्य क्रांतिकारक म्हणून ओळखले जाणारे वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र उठाव करण्याचे धाडस दाखविले. फडकेंनी स्वातंत्र्याच्या जाज्वल्य भावनेची ज्योत पेटवली आणि पुढील पिढ्यांना संघर्षाचा मार्ग दाखविला. त्यांची १७ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी असते. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.

४ नोव्हेंबर १८४५ रोजी रायगड जिल्ह्यातील शिरढोण येथे त्यांचा जन्म झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी काही काळ सरकारी नोकरी पत्करली. मात्र ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांनी त्यांचे मन अस्वस्थ झाले. १८७० च्या दशकात दुष्काळाने होरपळलेल्या जनतेची दयनीय अवस्था पाहून त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', ही भूमिका त्यांनी कृतीतून अधोरेखित केली. फडकेंनी शेतकरी, धनगर, कोळी, रामोशी आदी समाजघटकांना एकत्र करत ब्रिटिशांविरोधात उठाव उभारला. त्यांच्या लढ्याने ग्रामीण भागात स्वातंत्र्याची चळवळ चेतवली. ब्रिटिशांच्या खजिन्यांवर छापे टाकून त्यांनी शस्त्रसज्ज लढ्यासाठी निधी उभारला. या कृतीमुळे ब्रिटिश सत्तेला मोठे आव्हान निर्माण झाले होते.



१८७९ मध्ये ब्रिटिशांनी त्यांना अटक केली. जन्मठेपेची शिक्षा सुनावून त्यांना परदेशात कैदेत पाठविण्यात आले. १७ फेब्रुवारी १८८३ रोजी परकीय भूमीत त्यांचे निधन झाले. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणारा हा महान क्रांतिकारक अखेरपर्यंत आपल्या ध्येयाशी निष्ठावंत राहिला.
इतिहास अभ्यासकांच्या मते फडकेंच्या उठावाने पुढील क्रांतिकारकांना प्रेरणा दिली. सशस्त्र बंडाची बीजे त्यांनी रोवली आणि स्वातंत्र्यलढ्याचा पाया मजबूत केला. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध शासकीय व सामाजिक संस्थांकडून अभिवादन करण्यात येत आहे. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना देशभक्ती, त्याग आणि निष्ठेची प्रेरणा घेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन!**


# क्रांतीचे प्रेरणास्थान : लहुजी साळवे

**पुण्यतिथी विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात ज्यांनी आपल्या पराक्रमाने, संघटनशक्तीने आणि सामाजिक बांधिलकीने अमिट ठसा उमटवला, अशा क्रांतिकारकांमध्ये लहुजी साळवे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या कार्याची आणि विचारांची आठवण करणे म्हणजे अन्यायाविरुद्धच्या लढ्याची प्रेरणा नव्याने जागवणे होय. त्यांची दि. १७ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी असते. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा.

लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी झाला. ते पेशवाईच्या काळात वाढले. त्या काळात समाजात जातीय भेदभाव, अन्याय आणि विषमता प्रचंड प्रमाणात होती. अशा परिस्थितीत लहुजींनी शौर्य, संघटन आणि



स्वाभिमान यांचा मार्ग स्वीकारला. ते व्यायामप्रेमी, पराक्रमी आणि कुस्तीपटू होते. पुण्यात त्यांनी व्यायामशाळा सुरू करून तरुणांना शारीरिक प्रशिक्षण दिले. त्यांच्या व्यायामशाळेतून अनेक तरुणांनी शौर्य, शिस्त आणि देशभक्तीचे धडे घेतले.
लहुजी साळवे यांचे कार्य केवळ शारीरिक प्रशिक्षणापुरते मर्यादित नव्हते. ते सामाजिक परिवर्तनाचेही अग्रदूत होते. त्यांनी अस्पृश्यता, जातीय अन्याय आणि सामाजिक विषमता याविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी समाजातील वंचित घटकांना आत्मसन्मान आणि स्वाभिमानाची जाणीव करून दिली. त्यांच्या विचारांचा प्रभाव अनेक समाजसुधारकांवर पडला. विशेषतः महात्मा ज्योतिराव फुले यांना त्यांनी प्रेरणा दिली. फुले दांपत्यांच्या कार्यामागे लहुजींचे नैतिक आणि वैचारिक पाठबळ होते, असे इतिहास सांगतो.

लहुजी साळवे हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते क्रांतीचेही प्रेरणास्थान होते. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराच्या काळात त्यांनी तरुणांना संघटित करून लढण्यासाठी तयार केले. त्यांच्या व्यायामशाळा या केवळ व्यायामाचे केंद्र नव्हत्या, तर त्या स्वातंत्र्याच्या विचारांचे केंद्रस्थान होत्या. देशभक्ती, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद त्यांनी तरुणांमध्ये निर्माण केली. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे संघर्ष, त्याग आणि समाजसेवा यासाठी वाहिलेले होते. त्यांनी कधीही प्रसिद्धी किंवा सत्तेची अपेक्षा ठेवली नाही. वंचित, शोषित आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर झटले. म्हणूनच त्यांना 'क्रांतिगुरू' म्हणूनही ओळखले जाते. लहुजी साळवे यांचे १७ फेब्रुवारी १८८१ रोजी निधन झाले. मात्र त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव आजही समाजात जाणवतो. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जोपासना करण्याचा संकल्प केला पाहिजे. जात-पात, भेदभाव आणि अन्याय याविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. आजच्या पिढीने लहुजी साळवे यांच्या कार्याचा अभ्यास करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन!**

# महान भारतीय योध्दा : सगत सिंह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१९६५ में सगत सिंह की जिद से नाथू-ला पर चीनियों का कब्जा नहीं हो पाया था। जिसके कारण भारतीय सेना को टैक्टिकल एडवांटेज मिली हुई थी। चीनी चाह कर भी आगे नहीं बढ़ सकते थे। चीनियों ने बंदूक की जगह लाउडस्पीकर का सहारा लिया। वे लाउडस्पीकर पर हिंदी और अंग्रेजी में भारतीय सैनिकों को १९६२ की हार की याद दिलाते, उनके कपड़ों, कम सुविधाओं, कम वेतन को लेकर ताने मारते। कहते कि देखो, तुम्हारे अफसर तो मजे में एसी ऑफिसों में बैठे रहते हैं, और तुम्हें यहां मरने के लिए भेज दिया गया है।

सगत सिंह ने लाउडस्पीकर का जवाब लाउडस्पीकर से दिया। उन्होंने मैंडेरियन चाइनीज में रिकॉर्डेड मैसेज प्रसारित करने शुरू कर दिए। वो भी लगातार, लूप में। बात इतनी ही होती तो कोई दिक्कत नहीं थी। पर चीनी जब-तब दौरे पर निकली छोटी फौजी टुकड़ियों (पेट्रोलिंग पार्टीज) से बदसलूकी करते। एक बार तो छिपकर उन्होंने गोली भी चला दी जिससे 17 असम राइफल्स के दो जवान मारे गए। सीमा निर्धारित तो थी नहीं। चीनियों का कहना था कि ये टुकड़ी चीनी क्षेत्र में घुस आई थी।



सगत सिंह ने रोज-रोज की इस चिकचिक से परेशान होकर कोर्प्स कमांडर से बात की। लेफ्टिनेंट जनरल जे. एस. अरोड़ा ने उन्हें सलाह दी कि तुम बॉर्डर पर पैदल-पैदल चलो। अगर चीनियों ने कोई बवाल नहीं किया, तो इसका मतलब होगा कि वो उस जमीन को भारतीय मान रहे हैं। अगर सब ठीक रहा, तो जहां-जहां तुम चले होगे, वहां तार-बाड़, फेंस लगवा दो। सीमा का स्पष्ट निर्धारण हो जाएगा।

सगत सिंह ने बिलकुल यही किया। जब वे बॉर्डर पर चल रहे थे, दूसरी तरफ उनके साथ-साथ चीनी अफसर एक कैमरामैन के साथ चल रहा था। हालांकि वह कुछ बोला नहीं।

सगत सिंह ने फेंस लगाने का ऑर्डर दे दिया। २० अगस्त १९६७ से काम शुरू हो गया। चीनियों ने भारतीयों से काम रोकने को कहा, पर कोई रुका नहीं। चीनी कुढ़ते रहे, भारतीय लगे रहे। ६ सितंबर को ६ ग्रेनेडियर की पेट्रोलिंग पार्टी को चीनियों ने घेर लिया, और धमकी दी। अगले दिन उन्होंने तार-बाड़ को तोड़ने की कोशिश भी की। १० सितंबर तक काम लगभग पूरा हो चुका था। निर्णय लिया गया कि चीनी उतावले हो चले हैं। उनके द्वारा कोई एक्शन लेने से पहले काम पूरा कर लिया जाए। अगले दिन जितने भी उपलब्ध सैनिक थे, सभी को काम पर लगा दिया गया। उनकी सुरक्षा के लिए १८ राजपूत को बुलाया गया।

जब सुबह काम शुरू हुआ, चीनियों ने बदसलूकी शुरू कर दी। बात बढ़ते-बढ़ते बहुत बढ़ गई। २ ग्रेनेडियर के कमांडिंग ऑफिसर लेफ्टिनेंट कर्नल राय सिंह यादव मुंहजबानी लड़ाई में चीनियों की ऐसी-तैसी कर रहे थे। हालांकि सगत सिंह ने उन्हें वापस बंकर में आने को कहा, पर वर्षों से चीनियों की दादागिरी सहते आ रहे भारतीय अफसरों और सैनिकों का गुस्सा फूट पड़ा था।

अचानक ही चीनियों ने गोलियां चलानी शुरू कर दी। फेन्स पर काम कर रहे कई सैनिक मारे गए। मरने वालों में राय सिंह यादव भी थे (बुरी तरह घायल, सैनिकों ने समझा कि वे मारे गए)। अपने अफसर को गिरता देख ग्रेनेडियर्स पागल हो उठे। वे अपने खड्डों (ट्रेंच) से बाहर निकल आये और कैप्टन पी. एस. डगर के नेतृत्व में चीनियों पर हमला बोल दिया।

१९६२ की जंग में हुई शर्मनाक हार और वर्षों से चीनी प्रोपेगैंडा, चीनियों के महाशक्तिशाली होने के विश्वास के कारण, और अपने अफसर को बस यूहीं मरते देख कुछ ग्रेनेडियर्स अपनी पोस्ट छोड़ पीछे हटने लगे थे। यह देख खुद सगत सिंह स्टेनगन लेकर बाहर निकल आये और सैनिकों को उनका फर्ज, उनके अफसर का बलिदान याद दिला कर, उन्हें वापस अपने ट्रेंचों में भेजा।

१८ राजपूत के कुछ सैनिक और इंजीनियर भी मारे गए थे, मारे जा रहे थे। १८ राजपूत के कमांडर मेजर हरभजन सिंह को समझ आ गया कि जब तक चीनी बंकर को नहीं उड़ाया जाता, भारतीय सैनिक मरते रहेंगे। उन्होंने अपने सैनिकों को देख हुक्म दिया कि चीनी बंकर में घुसकर चीनियों को खत्म कर दिया जाए, और खुद बाहर निकलकर चीनियों की ओर बढ़ने लगे।

इस कोशिश में कई सैनिक वीरगति को प्राप्त हो गए, जिनमें मेजर हरभजन और कैप्टन पृथ्वी सिंह डागर भी शामिल थे। लेकिन उनके जोश ने भारतीय सैनिकों को चीनियों के बंकरों तक पहुंचा दिया था। बंकरों में घुसकर बन्दूक की संगीनों ने चीनियों की अतड़ियाँ निकाल ली गई।

मेजर और कैप्टन जैसे अफसरों के वीरगति को प्राप्त हो जाने के कारण छिटपुट लड़ाई एक पूर्ण युद्ध में बदल गई थी। यह युद्ध तीन दिन चला। सगत सिंह ने क्यांगनोसा-ला से मध्यम दूरी तक मार करने वाली तोपें मंगवा ली। दो साल पहले जिस पोस्ट को सगत सिंह ने खाली करने से मना कर दिया था, वहाँ ये तोपें लगाई गई और चीनियों को चुन-चुन कर मारा गया। अगर यह पोस्ट भारतीय कब्जे में न होती तो शायद १९६२ वाला हाल हुआ होता।

कुल ६५ भारतीय सैनिक वीरगति को प्राप्त हुए। चीनियों का आधिकारिक आंकड़ा ३०० था, जो सम्भवतः वास्तविक संख्या से बहुत कम था। फौजियों की मौत ने देश को खून के आंसू रुलाए, पर ६५ वीरों के बलिदान और १४५ घायलों ने देश को वह दे दिया था जो उससे कुछ सालों पहले छीनकर कुचल दिया गया था। १९६२ में जिस चीनी ड्रैगन ने अपने मुख की ज्वाला से हमें दग्ध किया था, १९६७ में उस ड्रैगन को पूँछ से पकड़कर घुमाकर पटक दिया गया था। १९६७ के बाद आज तक चीनियों की हिम्मत नहीं हुई कि वे एक गोली भी चला सकें।

# दहा महिन्यांत उभारली दहा कोटींची कंपनी

## भांडवल नसतानाही पूर्ण केले स्टार्ट-अपचे स्वप्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**



दोन जणांनी एकत्र येत १० महिन्यांत तब्बल १० कोटींची कंपनी उभारत विक्रम रचला आहे. त्यांनी कोणतेही भांडवल नसताना ही कंपनी उभारली आहे. या बेंगळुरूस्थित अॅडटेक कंपनीने अवघ्या १० महिन्यांत २५ हजार विद्यार्थ्यांना सेवा देऊन १०.५ कोटी रुपयांचा महसूल मिळविला आहे. डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झालेल्या या कंपनीने ध्येय आणि योग्य दृष्टिकोन ठेवून हे यश संपादन केले आहे. काजल दवे आणि रितेश जैन यांनी कोणतेही भांडवल नसताना या कंपनीची सुरूवात केली.

अहमदाबादच्या काजल दवे आणि उदयपूरच्या रितेश जैन यांच्या स्वप्नांमधून ही कंपनी विस्तारली आहे. झाली. काजलला अॅडटेक कंपनीचा रितेश जैनने न्यूझीलंडमधून एमबीए केले होते आणि त्याला टेलिकॉम व परदेशी शिक्षण सल्लागार क्षेत्रात अनुभव होता. त्याला भारतीय तरुणांची क्षमता जागतिक स्तरावर पोहोचवायची होती. सप्टेंबर २०२४ मध्ये बेंगळुरूमध्ये त्यांची भेट झाली आणि दोघांचे ध्येय एक झाले.

### कंपनीचा विक्रम

जानेवारी २०२५ मध्ये लॉन्चड् ग्लोबलने आपले काम सुरू केले. त्यावेळी त्यांच्याकडे कोणतीही बाह्य फंडिंग किंवा गुंतवणूकदारांचा आधार नव्हता. काजल आणि रितेश यांनी त्यांच्या मेहनतीवर आणि स्पष्ट मॉडेलवर विश्वास ठेवला. टीम तयार करणे, प्रशिक्षण देणे आणि संपूर्ण मॉडेल प्रत्यक्षात आणण्यात सुरूवातीला अडचणी आल्या. पण या संघर्षांमुळेच कंपनी अधिक मजबूत झाली. अॅडटेक जगात हा एक दुर्मिळ विक्रम आहे की कंपनीने काही महिन्यांतच जुलैपर्यंत नफा कमावण्यास सुरूवात केली. हे त्यांच्या व्यवसाय मॉडेल आणि अचूक धोरणामुळे साध्य झाले आहे.

### तीन क्षेत्रांवर लक्ष

कंपनीने ३ मुख्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले. यामध्ये अपस्किलिंग, स्टडी अब्रोड आणि हेल्थकेअर जॉब्स यांचा समावेश आहे. अपस्किलिंग अंतर्गत, एआय, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी यांसारखे जास्त मागणी असलेले कोर्सेस हिंदी- इंग्रजीत लाइव्ह मेंटर आधारित प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे छोट्या शहरातील विद्यार्थ्यांना शिकणे सोपे होते. स्टडी अब्रोड अंतर्गत, जगभरातील ५०० हून अधिक विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना विनाशुल्क प्रवेश सहाय्य, व्हिसा सपोर्ट आणि शिष्यवृत्ती मार्गदर्शन प्रदान केले जाते. हेल्थकेअर जॉब्स अंतर्गत, जर्मनीमध्ये नर्स आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन, भारतीय व्यावसायिकांना जर्मन भाषेचे प्रशिक्षण आणि नोकरी मिळवून देण्यास मदत केली जाते.

### कंपनीचे यश

कंपनीशी जोडलेले तब्बल ९० टक्के विद्यार्थी लहान शहरे आणि महाविद्यालयांमधून आहेत. आतापर्यंत ३०० हून अधिक तरुणांना प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली आहे. तसेच १०० हून अधिक विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी मिळाल्या आहेत. या मोठ्या यशानंतर कंपनी आता वेगाने आपल्या जागतिक विस्ताराकडे वाटचाल करत आहे. जेणेकरून भारतीय तरुणाचे कौशल्य जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविता येईल.

# शेतकऱ्यांसाठी मोठी संधी! शेणापासून ५ वस्तू तयार करा अन् लाखो रुपये कमवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


शेतीसोबत पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी गायी-म्हशींचे शेण हे केवळ कचरा नसून एक महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन ठरत आहे. पूर्वी शेणाचा वापर प्रामुख्याने सेंद्रिय खतापुरताच मर्यादित होता. मात्र बदलत्या काळात आणि वाढत्या पर्यावरणपूरक उत्पादनांच्या मागणीमुळे, शहरांमध्येही शेणापासून बनवलेल्या विविध वस्तूंना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत आहे. योग्य प्रक्रिया, कल्पकता आणि थोड्या गुंतवणुकीच्या जोरावर शेतकरी आणि पशुपालक शेणावर आधारित उद्योगातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळवू शकतात.

### १) शेणापासून बनवलेली कुंड्या

आजपर्यंत बागकामासाठी सिमेंट किंवा मातीच्या कुंड्यांचा वापर केला जात होता. मात्र या कुंड्या फुटल्यानंतर त्या कचऱ्यात जातात आणि पर्यावरणाला हानी पोहोचवतात. याच्या तुलनेत शेणापासून बनवलेल्या कुंड्या पूर्णपणे जैवविघटनशील असतात. या कुंड्यांमध्ये लावलेली रोपे अधिक चांगली वाढतात. कुंडी खराब झाल्यावर ती थेट कंपोस्टमध्ये वापरता येते, त्यामुळे कचरा कमी होतो आणि खतही तयार होते.

### २) शेणाच्या गोळ्या

धार्मिक विधी, हवन-पूजा आणि पारंपरिक समारंभांमध्ये शेणाच्या गोळ्यांचा मोठ्या प्रमाणावर



वापर केला जातो. या गोळ्या जळताना 3 ते 4 तास टिकतात आणि वातावरण शुद्ध करण्यास मदत करतात. जळाल्यानंतर उरलेली राख झाडांसाठी उत्तम पोषणद्रव्य ठरते. दसरा, दिवाळी आणि इतर धार्मिक सणांच्या काळात या गोळ्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते, त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा हंगामी पण फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो.

### ३) सेंद्रिय अगरबत्ती

पावसाळ्यात डासांचा त्रास वाढतो आणि बाजारातील रासायनिक अगरबत्ती आरोग्यास अपायकारक ठरू शकतात. यावर पर्याय म्हणून गायीच्या शेणापासून बनवलेल्या सेंद्रिय डास प्रतिबंधक अगरबत्त्या बाजारात लोकप्रिय होत आहेत. या अगरबत्त्यांमध्ये नैसर्गिक सुगंधी द्रव्यांचा वापर केला जातो. सेंद्रिय उत्पादनांकडे ग्राहकांचा वाढता कल पाहता, हा उद्योग शेतकऱ्यांना चांगला नफा देणारा ठरत आहे.

### ४) पर्यावरणपूरक राख्या

स्वदेशी उत्पादनांना वाढती मागणी आणि चिनी वस्तूंवरील बहिष्कारामुळे, गायीच्या शेणापासून बनवलेल्या राख्यांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. या राख्या सुगंधी, आकर्षक आणि पूर्णपणे पर्यावरणपूरक असतात. रक्षाबंधनाच्या सणापूर्वी या राख्यांची विक्री केल्यास शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते.

### ५) शेणाचे लाकूड

वनतोड वाढत असल्याने पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. अशा वेळी शेणापासून तयार केलेले कृत्रिम लाकूड हा उत्तम पर्याय ठरत आहे. याचा वापर हवन, अंत्यसंस्कार तसेच काही फर्निचर निर्मितीसाठीही केला जातो. यंत्राच्या साहाय्याने तयार केलेले हे लाकूड वाळवून, रंगवून बाजारात विकले जाते आणि यामधून मोठ्या प्रमाणावर नफा मिळवता येतो.

### ६) मूर्ती आणि सेंद्रिय खत

सिमेंट किंवा रासायनिक मातीपासून बनवलेल्या मूर्तींमुळे जलप्रदूषण वाढते. त्याऐवजी शेणापासून बनवलेल्या मूर्ती पाण्यात सहज विरघळतात आणि पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचवत नाहीत. याशिवाय, शेण आणि गोमूत्रापासून सेंद्रिय खत, जैवखत आणि जीवामृत तयार करून नैसर्गिक शेतीला चालना देता येते.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# पुढील २४ तासांत सूर्यग्रहणादरम्यान ‘या’ ३ राशींच्या इच्छा पूर्णत्वास!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार सूर्य आणि चंद्रग्रहण वेळोवेळी होतात. ज्याचा मानवी जीवनावर आणि जगावर परिणाम होतो. मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी कंकणाकृती सूर्यग्रहण होणार आहे. हे ग्रहण शनीच्या अधिपत्याखालील कुंभ राशीत पडेल. शिवाय या दिवशी बुधादित्य राजयोग, लक्ष्मी नारायण राजयोग, शुक्रदित्य राजयोग आणि चंद्र आणि मंगळ यांच्या युतीमुळे महालक्ष्मी राजयोग निर्माण होईल. या राजयोगांच्या निर्मितीमुळे काही राशींना सौभाग्य मिळू शकते. ज्यामुळे करिअर आणि व्यवसायात प्रगती होण्याची शक्यता असते. चला जाणून घेऊया या भाग्यवान राशी कोणत्या आहेत.

### मकर



सूर्यग्रहण तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. या काळात तुम्हाला तुमच्या कामात किंवा व्यवसायात प्रगती मिळू शकते. नोकरी करणाऱ्या व्यक्तींना कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदाऱ्या मिळू शकतात. स्वतःचा व्यवसाय करणाऱ्यांना या काळात आर्थिक लाभाच्या संधी मिळतील, ज्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. या काळात तुम्ही वाहन किंवा मालमत्ता खरेदी करण्याचा विचार देखील करू शकता.

### मिथुन




या राशीच्या लोकांसाठी सूर्यग्रहण सकारात्मक ठरू शकते. या काळात उत्पन्नाचे नवीन स्रोत उदयास येऊ शकतात. तुमच्या धैर्य आणि शौर्यासह तुमचा आत्मविश्वास देखील वाढेल. कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये प्रेम आणि सौहार्द वाढेल, ज्यामुळे मानसिक शांती मिळेल. या काळात व्यावसायिकांनाही लक्षणीय आर्थिक लाभ होऊ शकतो. तुम्ही एखाद्या धार्मिक किंवा शुभकार्यक्रमात देखील सहभागी होऊ शकता.

### सिंह



सूर्यग्रहण तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. या काळात तुमचे दैनंदिन उत्पन्न वाढू शकते. तुम्ही देशात किंवा परदेशात प्रवास देखील करू शकता. तुमचे नियोजित प्रकल्प यशस्वी होतील. या काळात बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते. तुमच्या प्रयत्नांमध्ये नशीब तुमची साथ देईल आणि प्रलंबित कामे पूर्ण होतील. या काळात तुम्हाला गुंतवणुकीतूनही फायदा होऊ शकतो







## सूर्यग्रहणकाळात कोणत्या चुका टाळाव्यात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खगोलशास्त्र आणि धार्मिक परंपरांमध्ये रस असणाऱ्यांसाठी २०२६ हे वर्ष विशेष महत्त्वाचे ठरणार आहे. मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी हे सूर्यग्रहण आहे. विशेष म्हणजे हे कंकणाकृती सूर्यग्रहण असणार आहे. ज्यामुळे खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातूनही या घटनेला मोठे महत्त्व आहे.

### ग्रहणाची वेळ आणि स्वरूप

पंचांगानुसार सूर्यग्रहणाची सुरूवात दुपारी ३ वाजून २६ मिनिटांनी होईल, तर सायंकाळी ७ वाजून ५७ मिनिटांपर्यंत हे ग्रहण चालू राहील. खगोलतज्ज्ञांच्या माहितीनुसार हे ग्रहण अंटार्क्टिका, आफ्रिकेतील काही भाग आणि दक्षिण अटलांटिक महासागराच्या परिसरात स्पष्टपणे दिसणार आहे. भारतात हे सूर्यग्रहण दिसणार नसल्याने देशात सुतक काळ लागू होणार नाही. आरोग्य आणि आर्थिक बाबींमध्ये सावधगिरी ज्योतिषीय मान्यतेनुसार ग्रहणकाळात आरोग्य व आर्थिक विषयांमध्ये विशेष काळजी घेणे आवश्यक मानले जाते. या काळात निष्काळजीपणा केल्यास शारीरिक त्रास किंवा आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणताही मोठा आर्थिक निर्णय, गुंतवणूक किंवा व्यवहार करण्यापूर्वी सखोल विचार करणे हिताचे ठरते. घरातील ज्येष्ठांचा सल्ला न घेता किंवा परिस्थितीचा अंदाज न बांधता निर्णय घेणे टाळावे.

### ग्रहण काळात काय करावे?

धार्मिक परंपरांनुसार ग्रहणकाळात मंत्र जप, अभिषेक पूजा करणे शुभ मानले जाते. सूर्य मंत्र किंवा महामृत्युंजय मंत्राचा जप केल्याने मानसिक शांतता मिळते, असे मानले जाते. सकारात्मक विचार ठेवणे, ध्यानधारणा करणं आणि शांततेत वेळ घालवणे या काळात लाभदायक ठरू शकते. दानधर्म करणेही शुभ समजले जाते.

### काय टाळावे?

ग्रहणकाळात स्वयंपाक करणे किंवा अन्नपदार्थांचे सेवन करणे टाळण्याची प्रथा आहे. तसेच वादविवाद, नकारात्मक चर्चा आणि तणावपूर्ण गोष्टींपासून दूर राहणे आवश्यक आहे. कोणतेही मोठे निर्णय, करार किंवा नवीन कामाची सुरूवात या काळात टाळावी. तसेच गर्भवती महिलांनी सूर्यग्रहणावेळी विशेष खबरदारी घेणे गरजेचे मानले जाते. या काळात तीक्ष्ण किंवा टोकदार वस्तू वापरणे टाळावे, तसेच अनावश्यक श्रम करू नयेत. मानसिक शांतता राखणे आणि सकारात्मक वातावरणात राहणे हे अधिक महत्त्वाचे ठरते.

## शनीच्या राशीत वर्षातील पहिले सूर्यग्रहण; भारतात सुतक काळ लागू होणार का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्ष अमावास्येला वर्षातील पहिले सूर्यग्रहण लागणार आहे. खगोलशास्त्रीयदृष्ट्या ही महत्त्वाची घटना असून यंदाचे हे ग्रहण वलयाकार स्वरूपाचे असेल. ‘रिंग ऑफ फायर’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रकारात सूर्य पूर्णपणे झाकला जात नाही, तर त्याभोवती अग्नीच्या वलयासारखा तेजोवलय दिसतो.

या दिवशी सूर्य कुंभ राशीत भ्रमण करत असताना राहूसोबत युतीत राहील, अशी ज्योतिषीय स्थिती सांगितली जाते. कुंभ ही शनीची रास मानली जाते. त्यामुळे ‘रानीच्या राशीत सूर्यग्रहण’ असा या घटनेकडे पाहिले जात आहे.

ग्रहणाची वेळ पुढीलप्रमाणे : दुपारी ३ :२६ वाजता आंशिक टप्प्याची सुरूवात, सायंकाळी ५ : १२ वाजता वलयाकार टप्प्याची सुरूवात, ५.४२ वाजता ग्रहणाचा चरणबिंदू आणि सायंकाळी ७ : ५७ वाजता समाप्ती.

### भारतामध्ये दिसणार का?

हे सूर्यग्रहण भारतात दिसणार नाही. दक्षिण अमेरिका, आफ्रिकेतील काही भाग, अटलांटिक



महासागर परिसर तसेच झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका, झांबिया, मोझांबिक, मॉरिशस, टांझानिया आणि अंटार्क्टिका या प्रदेशांत ते दृश्यमान असेल. त्यामुळे भारतीय नागरिकांना प्रत्यक्ष ‘रिंग ऑफ फायर’ पाहता येणार नाही.

### सुतक काळ लागू होणार का?

धार्मिक परंपरेनुसार सूर्यग्रहण सुरू होण्याच्या सुमारे १२ तास आधी सुतक काळ सुरू होतो. मात्र हे ग्रहण भारतात दिसत नसल्यामुळे पारंपरिक नियमांनुसार सुतक काळ लागू होणार नाही. त्यामुळे नियमित धार्मिक व दैनंदिन कामकाज सुरळीतपणे होतील.

### ‘रिंग ऑफ फायर’ म्हणजे काय?

वलयाकार सूर्यग्रहण तेव्हा घडते, जेव्हा चंद्र आपल्या कक्षेत पृथ्वीपासून तुलनेने अधिक अंतरावर असतो. त्यावेळी तो आकाशात आकाराने लहान दिसतो. सूर्य, चंद्र आणि पृथ्वी एका सरळ रेषेत आले तरी चंद्र सूर्याला पूर्ण झाकू शकत नाही. परिणामी सूर्याच्या कडा तेजस्वी राहतात आणि मध्यभागी काळसर भाग दिसतो. या तेजस्वी वलयामुळे ‘रिंग ऑफ फायर’ असा उल्लेख केला जातो.

### राशींवर संभाव्य परिणाम

वैदिक ज्योतिषानुसार सूर्य हा आत्मा, सत्ता, प्रतिष्ठा आणि नेतृत्वाचा कारक ग्रह मानला जातो. १३ फेब्रुवारीला सूर्याने कुंभ राशीत प्रवेश केला असून, १७ फेब्रुवारीला राहूच्या छायेमुळे ग्रहणयोग तयार होईल. या काळात कुंभ राशीत सूर्याबरोबर बुध, चंद्र आणि शुक्र यांचाही संयोग राहील, अशी ग्रहस्थिती सांगितली जाते.

ग्रहण भारतात दिसत नसले तरी ज्योतिषीय मान्यतांनुसार त्याचा सूक्ष्म प्रभाव सर्व राशींवर जाणवू शकतो, असे मत व्यक्त केले जाते. तथापि, वैयक्तिक कुंडलीतील ग्रहस्थिती, दशा आणि इतर योग यांनुसार परिणाम वेगवेगळे असू शकतात.

खगोलशास्त्रीयदृष्ट्या ही एक नैसर्गिक आणि नियमित घडणारी घटना असली, तरी सांस्कृतिक व धार्मिक परंपरांमुळे तिच्याकडे विशेष लक्ष दिले जाते. १७ फेब्रुवारी २०२६ रोजीचे हे वलयाकार सूर्यग्रहण त्यामुळे वैज्ञानिक आणि ज्योतिषीय अशा दोन्ही स्तरांवर चर्चेत राहण्याची शक्यता आहे.

## गणपती बाप्पांना ‘गजमुखी’ का म्हटले जाते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात गणपती बाप्पा हे अत्यंत पूजनीय आणि सर्वप्रथम वंदनीय देवता मानले जातात. कोणतेही शुभकार्य सुरू करण्यापूर्वी गणेश पूजन करण्याची परंपरा आहे. श्री गणेशांना अनेक नावांनी ओळखले जाते. गणपती, विनायक, लंबोदर, गजानन इत्यादी. त्यापैकी ‘गजमुखी’ हे एक विशेष नाव आहे. ‘गज’ म्हणजे हत्ती आणि ‘मुख’ म्हणजे चेहरा. हत्तीचे मुख असलेला देव म्हणजे गजमुखी. गणेशांच्या हत्तीमुखी रूपामुळे त्यांना हे नाव प्राप्त झाले आहे.

### पौराणिक कथा

श्री गणेशांच्या जन्माविषयी अनेक पुराणकथा सांगितल्या जातात. सर्वांत प्रचलित कथा अशी आहे की पार्वती यांनी आपल्या अंगावरील उटण्यापासून एक सुंदर बालक निर्माण केला. त्या बालकाला त्यांनी दारावर पहारा देण्याची आज्ञा केली आणि स्वतः स्नानासाठी गेल्या. काही वेळाने भगवान शिव तेथे आले. त्यावेळी त्या बालकाने शिवांना ओळखले नाही आणि पार्वती माता यांच्या आज्ञेप्रमाणे त्यांना आत जाण्यास नकार दिला.

शिवांना हा अपमान वाटला आणि त्यांनी रागाच्या भरात त्या बालकाचे मस्तक छेदन केले. पार्वती बाहेर आल्यावर त्यांनी हे दृश्य पाहिले आणि अतिशय दुःखी व क्रोधित झाल्या. त्यांनी संपूर्ण सृष्टीचा नाश करण्याची धमकी दिली. परिस्थिती गंभीर झाल्यावर शिवांनी आपल्या गणांना आदेश दिला की उत्तर दिशेला जाऊन जो पहिला प्राणी दिसेल त्याचे मस्तक आणावे. तो प्राणी हत्ती होता. त्या हत्तीचे मस्तक त्या बालकाच्या धडाला जोडण्यात आले आणि त्याला पुनर्जन्म मिळाला. शिवांनी त्याला ‘गणांचा अधिपती’ घोषित केले आणि प्रथम पूजनीयत्व बहाल केले. अशा प्रकारे गणेशांना हत्तीचे मुख प्राप्त झाले आणि ते ‘गजमुखी’ म्हणून ओळखले जाऊ लागले.

### गजमुखी रूपाचा प्रतीकात्मक अर्थ

गणेशांचे हत्तीमुखी रूप केवळ एक पौराणिक घटना नसून त्यामागे गहन तत्त्वज्ञान दडलेले आहे. हत्ती हा बुद्धिमान, शक्तिशाली आणि संयमी प्राणी मानला जातो. गणेशांच्या रूपातील प्रत्येक घटक काहीतरी संदेश देतो.

**मोठे मस्तक :** व्यापक विचार करण्याची क्षमता आणि मोठ्या ध्येयांचा विचार करण्याचे प्रतीक.

**मोठे कान :** सर्वांचे शांतपणे ऐकण्याची सवय. आधी ऐका, मग बोला हा संदेश.

**लहान डोळे :** एकाग्रता आणि सूक्ष्म निरीक्षणशक्ती.

**लांब सोंड :** लवचिकता आणि कार्यक्षमतेचे प्रतीक; सोंड मोठी झाडे उचलू शकते तसेच सूक्ष्म वस्तूही पकडू शकते.

**मोठे पोट (लंबोदर) :** सर्व अनुभव, सुख-दुःख पचविण्याची क्षमता.

या सर्व गुणांचा संगम म्हणजे आदर्श व्यक्तिमत्त्व. म्हणून श्री गणेशांचे गजमुखी रूप हे ज्ञान, संयम, शक्ती आणि समतोल यांचे प्रतीक मानले जाते.



### धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व

श्री गणेशांना विघ्नहर्ता म्हणजे अडथळे दूर करणारे देव मानले जाते. त्यांच्या गजमुखी रूपामुळे ते भक्तांच्या मनातील भीती दूर करतात आणि आत्मविश्वास देतात. भारतात विशेषतः गणेश चतुर्थी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सणात श्री गणेशांच्या विविध मूर्तींमध्ये गजमुखी रूपाचे दर्शन घडते. गणेशांच्या रूपातून मानवाला जीवनातील अनेक शिकवण मिळतेविनम्रता, संयम, बुद्धिमत्ता आणि कर्तव्यनिष्ठा. हत्ती हा प्राणी शांत असतो, परंतु आवश्यकतेनुसार शक्ती दाखवतो. त्याचप्रमाणे मानवानेही विवेकाने वागावे, हा संदेश श्री गणेशांच्या गजमुखी रूपातून मिळतो. ‘गजमुखी’ हे नाव गणेशांच्या हत्तीमुखी स्वरूपामुळे पडले असले, तरी त्यामागे केवळ कथा नाही तर सखोल तत्त्वज्ञान दडलेले आहे. पार्वती आणि शिव यांच्या कथेमुळे हे रूप प्राप्त झाले. परंतु त्यातून मानवाला जीवनमूल्यांचा संदेश मिळतो. बुद्धी, शक्ती, संयम आणि समजूतदारपणा यांचे सुंदर मिश्रण म्हणजे गजमुखी गणेश. त्यामुळेच श्री गणेशांना श्रद्धेने ‘गजमुखी’ म्हणून संबोधले जाते आणि ते आजही भक्तांच्या हृदयात सर्वोच्च स्थान राखून आहेत.

# सूर्यग्रहण व श्री मंगळग्रह यांचा संबंध आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आकाशात घडणाऱ्या खगोलीय घटना मानवाला नेहमीच आकर्षित करत आल्या आहेत. त्यात सूर्यग्रहण ही अत्यंत प्रभावी आणि दुर्मिळ घटना मानली जाते. अनेकदा लोकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की सूर्यग्रहणाचा श्री मंगळग्रह यांच्याशी काही संबंध आहे काय? खगोलशास्त्रीय दृष्टीने पाहता सूर्यग्रहण आणि श्री मंगळग्रह यांचा थेट काहीही संबंध नाही.

### सूर्यग्रहण म्हणजे काय?

सूर्यग्रहण ही घटना तेव्हा घडते जेव्हा चंद्र पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्ये येतो. या स्थितीत चंद्र सूर्यप्रकाश काही काळासाठी अडवतो आणि पृथ्वीवरील काही भागांवर सावली पडते. सूर्यग्रहण अमावास्येला होते. कारण त्यावेळी चंद्र सूर्याच्या दिशेला असतो. सूर्यग्रहणाचे प्रकारपूर्ण, खंडग्रास आणि वलयाकृतीहे चंद्राच्या सावलीच्या आकारावर आणि पृथ्वीवरील निरीक्षकाच्या स्थानावर अवलंबून असतात. ही घटना पूर्णपणे पृथ्वी-चंद्र-सूर्य यांच्या परस्पर स्थितीवर आधारित असते.

### श्री मंगळग्रहाची भूमिका काय?

श्री मंगळग्रह हा सूर्याभोवती फिरणारा पृथ्वीबाहेरील ग्रह आहे. तो पृथ्वीपासून सरासरी सुमारे २२.५ कोटी किलोमीटर अंतरावर असतो (अंतर कक्षांच्या स्थितीनुसार बदलते). श्री मंगळ ग्रह यांचा सूर्यग्रहणाशी थेट संबंध नाही. कारण सूर्यग्रहण घडण्यासाठी आवश्यक असलेली रेषात्मक मांडणी फक्त सूर्य, चंद्र आणि





पृथ्वी यांच्यातच असते. तथापि, खगोलशास्त्राच्या दृष्टीने सर्व ग्रह सूर्याभोवती फिरतात. कधी-कधी श्री मंगळग्रह आणि पृथ्वी एका सरळ रेषेत येऊ शकतात. पण या स्थितीचा सूर्यग्रहणावर कोणताही परिणाम होत नाही.

### खगोलशास्त्रीय स्पष्टीकरण

सौरमालेतील सर्व ग्रह सूर्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे त्याच्याभोवती भ्रमण करतात. सूर्यग्रहण ही केवळ पृथ्वीच्या उपग्रहामुळे म्हणजे चंद्रामुळे घडणारी घटना आहे. श्री मंगळग्रहाचा आकार पृथ्वीपेक्षा लहान असला, तरी तो पृथ्वीपासून खूप दूर आहे. त्यामुळे त्याची सावली पृथ्वीवर पडणे किंवा सूर्यप्रकाश अडवणे अशक्य आहे. कधी- कधी लोकांना वाटते की ग्रहांची विशिष्ट मांडणी झाल्यास ग्रहणावर परिणाम होऊ शकतो. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनातून हे चुकीचे आहे. सूर्यग्रहणाची गणिते अत्यंत अचूकपणे मोजता येतात आणि त्यासाठी फक्त पृथ्वी व चंद्राच्या कक्षांचा विचार केला जातो.

### श्री मंगळग्रहावरून दिसणारे ग्रहण

एक रोचक बाब म्हणजे जसे पृथ्वीवर सूर्यग्रहण दिसते तसेच श्री मंगळग्रहावरूनही सूर्यग्रहण दिसू शकते. श्री मंगळग्रहाचे दोन लहान उपग्रह फोबोस आणि दैमॉस कधी- कधी श्री मंगळग्रहावरून पाहताना सूर्याच्या समोरून जातात. मात्र हे ग्रहण पृथ्वीवरील ग्रहणापेक्षा वेगळे असते. कारण हे उपग्रह खूप लहान आहेत आणि सूर्य पूर्णपणे झाकू शकत नाहीत.

### ज्योतिष आणि श्रद्धा

ज्योतिषशास्त्रात सूर्य, चंद्र आणि श्री मंगळग्रह यांना विशेष महत्त्व दिले जाते. काही श्रद्धांनुसार ग्रहांच्या स्थितीचा मानवी जीवनावर परिणाम होतो, असे मानले जाते. तथापि, आधुनिक विज्ञान या दाव्यांना समर्थन देत नाही. सूर्यग्रहण ही पूर्णपणे नैसर्गिक आणि खगोलशास्त्रीय घटना आहे. सूर्यग्रहण आणि श्री मंगळग्रह यांचा थेट संबंध नाही. सूर्यग्रहण ही पृथ्वी, चंद्र आणि सूर्य यांच्या विशिष्ट मांडणीमुळे घडणारी घटना आहे. श्री मंगळग्रह हा स्वतंत्रपणे सूर्याभोवती फिरणारा ग्रह असून त्याचा ग्रहणाच्या प्रक्रियेवर कोणताही प्रभाव पडत नाही. म्हणूनच सूर्यग्रहणाबद्दलच्या गैरसमजुती दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. आकाशातील प्रत्येक घटना ही निसर्गाच्या अचूक नियमांनुसार घडते आणि त्यामागे खगोलशास्त्राचे सुंदर गणित दडलेले आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)